# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## दरपत्रक सुचना

जा.क्र.नांवाशमनपा/उद्यान/6024/2024 दिनांक :- 23/08/2024

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे खालील दर्शविण्यात आलेल्या कामाकरीता संबंधीत क्षेत्रातीत तज्ञ व अनुभवी संस्थेकडुन खालील प्रमाणे मोहरबंद दरपत्रक मागवत आहोत. सदर दरपत्रक सुचना महानगरपालिकेच्या (https://nwcmc.gov.in) या संकेतस्थळावर तसेच मनपा नोटीस बोर्ड येथे पहावयास मिळेल. कोरे दरपत्रक केवळ उद्यान विभाग, ऑफिस रुम नं.213, 2रा मजला मुख्य कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका येथुन खरेदी करता येतील तसेच दरपत्रक नियम व अटी पहावयास मिळतील.

**दरपत्रक वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | दरपत्रक प्रकाशित करणे | 26/08/2024 | 15.00 |
| 2 | दरपत्रक खरेदी करणे | 26/08/2024 | 15.00 |
| 3 | दरपत्रक भरणे | 26/08/2024 | 15.00 |
| 4 | दरपत्रक भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 03/09/2024 | 15.00 |
| 5 | दरपत्रक उघडणे | 04/09/2024 | 11.00 |

| कामाचे नाव | अंदाजित किंमत | इसाऱ्याची रककम रुपये 1% | अनामत रक्कम रु. 2% | कोऱ्या दरपत्रकाची किंमत+28 % GST | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| "नांदेड वाघाळा शहर महानगपालिकेचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल 2024-25 (ESR-Environmental Status Report) तयार करणे". | - | 3000/- | 6000/- | 256/- | 3 महीने |

**दरपत्रक नियम व अटी**

1. दरपत्रकाची " हार्ड कॉपी " 1 प्रतीत संस्थेनी दिनांक 03/09/2024 पर्यंत दुपारी 3.00 वाजेपर्यंत उद्यान विभाग, ऑफिस रुम. नं. 213, 2रा मजला, मुख्य कार्यालय नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे.
2. संस्थेने खालील कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे,
   अ) संस्था नोंदणीकृत असणे (प्रमाणपत्र सादर करणे) आवश्यक आहे.
   ब) आधार व पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे.
   क) GST कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र ची प्रत सादर करणे आवश्यक आहे.
   ड) संस्थेने मागील तीन वर्षाचे आयकर (Income Tax) भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
   इ) दरपत्रकधारकाने कोऱ्या दरपत्रकाची किंमत (Tender Fee) लेखा विभागात जमा करुन पावती दाखल करावी व इसारा रक्कम (EMD) हि CDR/FDR स्वरुपात अतिरीक्त आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांचे नावे भरणा करावी.
3. संस्थेने पर्यावरण क्षेत्रात काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
4. संस्थेने ESR तयार करतांना खालील बाबींच्या अनुषंगाने काम करणे आवश्यक आहे,
   अ) <u>माहितीचे संकलन</u>:
   1) सॅटेलाईट छायाचित्रे व रिमोट सेन्सींग तंत्रज्ञानाचा वापर करावा.
   2) क्षेत्र सर्वेक्षण करुन नमुने गोळा करावे लागतील.
   3) विद्यमान पर्यावरणीय डेटाबेस आणि अहवालांमधून डेटा गोळा करावे.
   ब) <u>माहितीचे विश्लेषण</u>:
   1) ट्रेंड आणि पॅटर्नचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय पद्धती वापरावी लागेल.
   2) पर्यावरणीय बदल मॅप करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) वापरावे.
   3) विविध पर्यावरणीय घटकांसाठी प्रभाव मूल्यांकन आयोजित करावे.
   क) <u>अहवाल/आराखडा देणे</u>:
   1) सर्वसमावेशक अहवालात निष्कर्ष संकलित करणे.
   2) अहवाल व्यापक प्रेक्षकांसाठी समजण्यायोग्य असल्याची खात्री करणे.
   3) स्पष्टतेसाठी चार्ट, आलेख आणि नकाशे यासारख्या व्हिज्युअल अ‍ॅड्सचा समावेश करणे.
5. संस्थेला आवश्यक साहित्य व मनुष्यबळ यासाठीचा व इतर खर्च संस्थेस स्वत: करावा लागेल.
6. कामाच्या उणिवांच्या दुरुस्तींचा कालावधी पुढील दोन वर्षाकरीता राहील. तो कालावधी संपल्यानंतरच सुरक्षा अनामत रक्कम संबंधीतास परत करण्यात येईल.

7. तांत्रिक (पहिल्या) लिफाप्यात कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्याशिवाय दुसरा लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्या बाबत दरपत्रकधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
8. सदरील कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन करारनाम्यात दर्शविलेल्या कालावधीच्या आत काम पुर्ण करावे लागेल. दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास करारनाम्यातील अटीप्रमाणे दंड लावण्यात येईल. कार्यरंभादेश देण्यापुर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
9. संस्थेने त्यांना मिळालेल्या कामात जर 10 पेक्षा अधिक कामगारांचा समावेश असेल तर त्यांचा नियामानुसार EPF व ESIC भरणे त्यांना आवश्यक असेल.
10. कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व दरपत्रक स्विकारणे/नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी राखुन ठेवले आहेत.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रतिलिपी,
1. संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सदरची दरपत्रक सुचना मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.
2. जनसंपर्क विभाग, नांवाशमनपा, नांदेड यांनी सदरची दरपत्रक सुचना मनपा नोटीस बोर्डवर दर्शनी भागावर डकविण्यात यावी.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड